नवप्रभा मंगळवार दि. २३ सप्टेंबर २०१४

# दोडामार्ग येथील हळबे महाविद्यालयात हास्य मैफल व 'सिंधुदुर्ग डिस्को'ला प्रतिसाद

**दोडामार्ग**

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात मराठी भाषा व वाड्.मय मंडळातर्फे हास्यसम्राट अरुण गवंडळकर यांचा हास्यमैफल व सिनेअभिनेते रामदास पारकर यांचा 'सिंधुदुर्ग डिस्को' हा मालवणी गीत गायनाचा संयुक्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना गवंडळकरांनी आपल्या अभिनय शैलीने खळखळून हसायला लावले. तर रामदास पारकर यांनी आपल्या गीत गायनातून उपस्थितांची पावले थिरकायला लावली. जीवनात यशस्वी होण्यासाठी ध्येय ठरवले पाहिजे व ते पूर्ण करण्यासाठी परिश्रमाबरोबरच प्रत्येकाने जीवनाकडे खिलाडूवृत्तीने पाहिले पाहिजे. जीवन सुंदर बनण्यासाठी विनोदाचा आस्वाद घेणे ही महत्वाचे आहे असे विचार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन विचार श्री. गवंडळकर यांनी व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उदंड प्रतिसाद दिला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख मान्यवरांच्या स्वागतगीताने झाली.

सिनेअभिनेते पारकर यांनी आपली विविध मालवणी गीते सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढविली. अनेक प्रेमगीते सादर करत आपल्या जोशपूर्ण मालवणी ढंगात नृत्यही केले. यावेळी व्यासपीठावर अरुण गवंडळकर, सिनेअभिनेते रामदास पारकर, मराठी भाषा वाड्मय मंडळ प्रमुख प्रा. दिलीप बर्वे, डॉ. एस. यु. दरेकर, प्रा. एस. एन. खडपकर, मराठी भाषा मंडळाचे विद्यार्थी प्रतिनिधी भूषण सावंत उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मराठी भाषा वाड्.मय मंडळ प्रमुख प्रा. दिलीप बर्वे, डॉ. एस. यु. दरेकर, प्रा. एस. एन. खडपकर, मराठी भाषा मंडळाचे विद्यार्थी प्रतिनिधी भूषण सावंत उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मराठी भाषा वाड्.मय मंडळ सर्व सदस्य, सर्व सदस्य, सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी भाषा वाड्.मय मंडळ प्रमुख प्रा. दिलीप बर्वे यांनी सूत्रसंचालन अनिल गावडे याने मुलाखत भूषण सावंत तर आभार प्रदर्शन भावना साळकर हिने केले.